# नेतृत्वाचा आदर्श यशवंतराव चव्हाण



संपादक
डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील

# नेतृत्वाचा आदर्श : यशवंतराव चव्हाण

NETRUTVACHA AADARSH : YASHWANTRAO CHAVHAN

ISBN - 978-93-95942-03-4

(प्रकाशन क्रमांक -4)

■ संपादक

डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील,

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,

ता. अहमदपूर, जि. लातूर. मो. ९४२३७१९०१६

■ प्रकाशक

छाया प्रकाशन

खोरी गल्ली, अंबाजोगाई रोड, लातूर

© संपादक

■ मुखपृष्ठ

प्रा. गोविंद काळे

■ प्रथमावृत्ती

१२ मार्च २०२३ (यशवंतराव चव्हाण जयंती)

■ अक्षर जुळणी

अशिष डिजिटल, लातूर, मो. ९५२७३३२००२

■ मुद्रक –

इन्फिनेट कम्पुटर्स, लातूर

■ किंमत – २००/-

टीप : सदरील संपादित पुस्तकातील लेख आणि लेखकांच्या मतांशी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही

साहित्य रसिकाग्रणी असणाऱ्या यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या कृषी, शैक्षणिक, आर्थिक, सहकार, ग्रामविकास, औद्योगिक, सांस्कृतिक विकासाला चालना दिली साहित्य, कला, क्रिडा, संस्कृती अशा विविध क्षेत्रांतील त्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले. १९७२ च्या दशकापर्यंत यशवंतराव चव्हाणांचा काँग्रेस पक्षाच्या राजकारणात प्रभाव होता.त्यानंतर त्यांच्या प्रभावात झपाट्याने ऱ्हास झाल्याचे स्पष्ट होते.सन १९७८ मध्ये त्यांनी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाचा त्याग करून रेड्डी काँग्रेसमध्ये केलेला प्रवेश ही त्यांची सर्वात मोठी चूक ठरली.नंतरच्या काळात काँग्रेस पक्षात पुनप्रवेशकर्ते होऊन जनता पक्षाच्या फुटीर गटाचे नेते पंतप्रधान चरणसिंगांच्यानेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रीमंडळात उप पंतप्रधान झाले. इंदिरा काँग्रेस पक्षात प्रवेश दिल्यानंतर आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. पण पुढे लवकरच २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाल्याने त्यांची राजकीय कारकीर्दही संपुष्टात आल्याचे स्पष्ट होते.


संदर्भ ग्रंथसुची :-

१. बोकील नीता पहिली आवृत्ती १ मे २०१२, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास १९६०-१९७२, मौजे प्रकाशन गृह, मुंबई, पृ.२१२
२. नलावडे प्रमोद त्र्यं.(संपा.)लोकराज्य मार्च २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई, पृ.४
३. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती २००७, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद पृ. ११ व १२
४. नलवाडे प्रमोद त्र्यं. (संपा.) लोकराज्य (मासिक) मार्च २०१२ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पृ.१० व ११.
५. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती २००७, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, उपरोक्त पृ. ३२ ते ४९
६. करडेकर अनिल शेषराव द्वितीयावृत्ती २६ जानेवारी २०१८, महाराष्ट्राची वाटचाल, श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृ. २३
७. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती २००७, उपरोक्त पृ.५७
८. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती २००७, उपरोक्त पृ.७६
९. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती २००७, उपरोक्त पृ. ७७




७

# यशवंतराव चव्हाण यांची पंचायतराज धोरण राबविण्यामागची भूमिका


**डॉ. धोंडीराम कामाजी धुमाळे,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख,
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंपाळ.


महाराष्ट्र हे स्थानिक स्वराज्यसंस्था अतिशय सक्षमपणे राबविणारे देशातील महत्त्वाचे राज्य आहे. देशात पंचायतराज व्यवस्था राबविण्याचा पहिला मान महाराष्ट्र राज्यास द्यावा लागतो. याचे महत्त्वाचे कारण तत्कालीन राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांचे दूरदर्शी नेतृत्व होय. महाराष्ट्र ही पूरोगामी विचाराची भूमी असल्यामुळे वेळोवेळी विविध लोककल्याणकारी नेत्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाचे अतिशय सक्षमपणे नेतृत्व केले आहे. यामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख आदराने करावा लागतो. एका सामान्य कुटुंबात जन्म ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच देशातील विविध महत्त्वाच्या केंद्रीय खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी आपल्या स्वतंत्र कार्याची ओळख निर्माण केली आहे. स्वतंत्र झालेल्या भारत देशास प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी येथील सर्वसामान्य लोकांचे सहकार्य लाभणे गरजेचे आहे, ही भूमिका विचारात घेऊन त्यांनी आपले राजकारण केले आहे. प्रत्येक वेळी प्रश्न घेऊन सर्वसामान्य जनतेस जिल्हा, राज्य वा केंद्र शासनाकडे जाणे शक्य नसल्यामुळे स्थानिक पातळीवरील लोकांची समस्या स्थानिक नेतृत्वाकडून सोडवली जावी या उदात्त हेतूने तत्कालीन राजकीय नेतृत्वाचा विरोध पत्करून यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्यसंस्थेचा कायदा पारित केला. परिणामी आज ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा विविध स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या माध्यमातून जनकल्याणकारी योजना राबविल्या जातात. या प्रणालीमुळे स्थानिक राजकारणात स्त्रियांचा वावरही वाढत गेला. त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा निश्चितपणे फायदा देशाला झालेला आहे, हे इथे नाकारता येत नाही. देशाची अर्धी शक्ती असलेल्या स्त्रियांना राजकारणाच्या

केंद्रस्थानी आणण्यात पंचायत राज प्रणाली यशस्वी ठरली. याचे सर्वस्वी श्रेय यशवंतराव चव्हाण यांना द्यावे लागते. आज देशाचा अमृत महोत्सव साजरा करताना तसेच मराठवाडा स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी साजरी करताना देश आणि राज्याला दिशा देणाऱ्या उमद्या नेतृत्वाचे स्मरण करावेच लागते. शिवाय यावर्षी आपण यशवंतराव चव्हाण यांची ११० वी जयंती साजरी करीत आहोत. असा तिहेरी योग लक्षात घेऊन पंचायत व्यवस्थेचे निर्मिते म्हणून आपणास यशवंतराव चव्हाण यांचा उलेख आदराने करावा लागतो. देशाची वाटचाल शतकाकडे होत असताना मागील कालखंडातील काही महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. पुढीलप्रमाणे पंचायतराज व्यवस्था राबविण्यामागील यशवंतराव चव्हाण यांची नेमकी भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करू.

**उद्दिष्टे –**

१. लोकशाहीचे सबलीकरण करणे.
२. स्थानिक नेतृत्वास संधी उपलब्ध करून देणे.
३. पंचायतराजच्या निमित्ताने स्थानिक प्रश्न स्थानिक पातळीवर सोडविणे.
४. ग्रामीण प्रश्नांची सोडवणूक सुलभतेने करणे.
५. पंचायतराज व्यवस्था निर्मिती मागील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका समजून घेणे.
६. पंचायत राज व्यवस्थेने स्थानिक महिला नेतृत्वास संधी उपलब्ध करून दिली आहे याचा विचार करणे.
७. ग्रामीण पातळीवरील प्रत्येकास राजकारणाच्या केंद्रस्थानी आणण्यात पंचायत राज प्रणाली महत्वाची ठरली आहे, याचे संक्षेपाने अध्‍ययन करणे.

**गृहितके –**

१. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील महत्त्वाचे नेते आहेत.
२. त्यांच्या कार्यकाळात पंचायतराज व्यवस्था निर्मितीचा कायदा पारित झाला.
३. पंचायतराजमुळे स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक नेतृत्व उदयास आले.
४. ग्रामीण वा स्थानिक महिला नेतृत्वाची दखल पंचायतराज प्रणालीमुळे घेतली गेली आहे.
५. पंचायतराज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आहे.
६. लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी पंचायत राज व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरली आहे.



७. महाराष्ट्र हे पंचायतराज व्यवस्था राबविणारी देशातील पहिले राज्य आहे.

**प्रमुख संज्ञा –**

पंचायत राज, सत्येचे विकेंद्रीकरण, स्थानिक नेतृत्व विकास, लोकशाहीचे सबलीकरण, स्थानिक महिला नेतृत्व, स्थानिक प्रश्नांची सोडवणूक, राज्यसूची आदी.

**संदर्भ स्त्रोत –**

प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी द्वितीयक संदर्भ साधनांचा आधार घेतला आहे. गरजेनुसार वृत्तपत्र, इंटरनेट आदी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध माहितीचा आधार घेतला आहे.

**विषय प्रवेश –**

नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताने लोकशाहीचा अवलंब केला. जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून भारत नावारूपास आला. लोकशाही शासन प्रणालीस अधिक बळकट करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे नितांत आवश्यक होते. शिवाय समाजातील सर्व स्तरातील स्त्री पुरुषांच्या नेतृत्व गुणाचा विकास आणि वापर होणे देशाच्या उभारणीत उपयुक्त ठरले असते. परिणामी यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून स्थानिक जनतेला निर्णय प्रक्रियेचा भाग बनविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय संघराज्यातील एक पुरोगामी लोकसत्ताक घटक राज्य बनविण्यात यशवंतराव चव्हाण यांना यश मिळाले. याचे कारण त्यांनीही विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण शेतकरी व बहुजन समाजाच्या विकासासाठी पंचायतराज व सहकाराचा रचनात्मक कृतिशील कार्यक्रम राबविला."[१] डॉ. अजितानंद जाधव यांचे वरील मत याबाबत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रास तसेच देशातील इतर घटक राज्यांना पुरोगामी मार्गाने प्रवास करण्यासाठी सहकार आणि पंचायतराज या दोन महत्त्वाच्या बाबींचा परिचय करून दिला. पुढीलप्रमाणे पंचायतराज व्यवस्था राबविण्यामागची यशवंतराव चव्हाण यांची नेमकी भूमिका विचारात घेऊ.

**१. सत्येचे विकेंद्रीकरण –**

सत्तेचे विकेंद्रीकरण हा विचार आणि कृती लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. ब्रिटिशांच्या एकाधिकारशाहीतून मुक्त झालेल्या भारतास लोकशाहीच्या मार्गाने पुढील प्रवास करायचा होता. स्थानिक जनतेचा राजकारणात

सहभाग आणि त्यावर विश्वास वाढल्या शिवाय हे शक्य नव्हते म्हणून स्थानिक स्वराज्य खात्याचा कारभार पाहत असताना यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरण आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पंचायत राज प्रणालीचा विचार मांडला. "सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा कायदा यशवंतरावांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत झाला. सत्तेचे विकेंद्रीकरण करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत राज्याची योजना प्रत्यक्षात मात्र १ मे १९६२ रोजी अमलात आली. अशा तऱ्हेची योजना अंमलात आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होय."[२] वरील मत विचारात घेता महाराष्ट्रात आणि देशात पंचायत राज प्रणाली राबविण्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांनाच द्यावे लागते. प्रत्यक्षात अंमलबजावणी जरी यशवंतराव चव्हाण यांच्या मृत्यूनंतर झालेली असली तरी त्याची संपूर्ण तयारी मात्र त्यांच्याच कार्यकाळात झाली होती, हे इथे विचारात घेतले पाहिजे.

## २. ग्रामीण भागातील नेतृत्वाची जडणघडण –

स्वातंत्र्य मिळाले मात्र ते दीर्घ टिकविण्यासाठी आणि येथील जनता सक्षम बनण्यासाठी त्यांचा राजकारणात सहभाग वाढणे नितांत आवश्यक होते. निर्णय प्रक्रियेचा भाग झाल्याने ग्रामीण भागातील नेतृत्वाची जडणघडण शक्य होती. शिवाय राज्य आणि केंद्रातील नेतृत्वावर पडणारा अतिरिक्त भारही कमी होणे शक्य झाले असते. प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे यांनी म्हटल्याप्रमाणे "सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यामागे यशवंतराव चव्हाण यांची प्रामुख्याने दोन हेतू होते. पहिला म्हणजे सर्वसामान्य माणसाला आपल्या अडचणी व आपले प्रश्न सोडवण्यासाठी उठसुट जिल्हा पातळीवर तसेच मंत्रालयात जाण्याची गरज पडणार नाही व दुसरा म्हणजे स्थानिक पातळीवर एका कार्यक्षम नेतृत्वाची उभारणी होईल. पर्यायाने ग्रामीण भागातून नेतृत्वाची जडणघडण होईल."[३] यशवंतराव चव्हाण यांच्या मनातील पंचायतराज योजना राबविण्याची नेमकी भूमिका डॉ. एरंडे यांनी सांगितली आहे. ग्रामीण भागातून कार्यक्षम, सक्षम नेतृत्व उदयास येऊन समाज आणि देशाच्या प्रगतीत त्याचे योगदान राहील हा उदात्त हेतू या मागे होता. आज देशाच्या राजकारणात असंख्य नेते ग्रामीण भागातून आलेले दिसतील शिवाय पंचायतराज मधील आरक्षण धोरणामुळे महिलांनाही आपली क्षमता राजकीय विकासात वापरता येणे शक्य झाले आहे. कधी काळी केवळ चूल आणि मूल असे बंदिस्त जीवन जगणाऱ्या स्त्रिया आधुनिक काळात सक्षमपणे राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रात आल्या. देशाच्या राजकारणात



आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण करण्यात त्यांना त्यांनी घेतला पंचायत राज मधील अनुभव नक्कीच कामी आला आहे, हे नाकारता येत नाही. तसेच विविध जाती, धर्मातील तसेच वर्गातील व्यक्ती आज राजकारण, समाजकारण, अर्थकारणात धोरणात्मक निर्णय घेताना दिसतात. जातीचा कोणताही न्यूनगंड न बाळगता सक्षमपणे आणि तितक्याच आत्मविश्वासाने उभे राहण्याची ताकद पंचायत राजमुळे प्राप्त झाली आहे. स्वातंत्र्य सूर्याची किरणे प्रत्येक झोपडीत पोहचविण्यात आपले सरकार यशस्वी झाले ते पंचायत राजमुळे हे विसरून चालत नाही. एकूण स्वतंत्र भारताच्या अगदी सुरुवातीच्या काळात देशाची घडी व्यवस्थित बसविण्यात पंचायत राज प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरली आहे. याचे पूर्णपणे श्रेय यशवंतरावांच्या दूरदर्शीपणाला द्यावे लागते.

## ३. स्थानिक प्रश्न सोडविणे सुलभ –

सत्तेचे विकेंद्रीकरण केल्याशिवाय भारतीय लोकशाहीची पाळीमुळे घट्ट होणार नाहीत आणि सर्वसामान्य लोकांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी हक्काचे व्यासपीठ प्राप्त होणार नाही. या भूमिकेतून यशवंतराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापनेचा आग्रह धरला. "जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकांना स्थानिक आणि इतर प्रश्नांची सोडवणूक करणे सुलभ होईल अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी पंचायतराज व्यवस्थेच्या स्थापनेला आपल्या राजकीय क्षेत्रातील कार्यात प्राधान्यक्रम दिला."[४] वरील भूमिका ग्रामीण भागातील नेतृत्व उभारणीस उपकारक आहे. स्थानिक प्रश्नाची सोडवणूक स्थानिक पातळीवर झाल्यास आपोआप वेळेची बचत होणे शक्य होते. शिवाय स्थानिक प्रश्नांची योग्य जाण असल्यामुळे ते वेळेत सुटणेही सहज शक्य झाले असते. स्थानिक नेतृत्वास आपल्या परिसर, तेथील गरजा, त्या सोडविण्याची तीव्रता अशा कितीतरी महत्त्वाच्या बाबींचा अंदाज असल्यामुळे स्थानिक प्रश्न सोडविण्यात स्थानिक नेतृत्वास नक्कीच मदत झाली असती हे इथे विचारात घेतले पाहिजे. सातत्याने पाठपुरावा करण्याचा स्थानिक जनतेस फारसे कष्ट पडले नसते. शिवाय स्थानिक बोली भाषेचा वापर करून नक्कीच संवाद साधणे सहज सुलभ गेले असते अशा कितीतरी उपकारक गोष्टी एकाच वेळी घडत असल्यामुळे पंचायतराज प्रणाली लवकरच सबंध देशात स्वीकारली गेली. असे असले तरी पंचायतराज प्रणालीची सुरुवात सर्वप्रथम महाराष्ट्रात झाली आहे हे विसरता येत नाही.

## निष्कर्ष -

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र तसेच सबंध देशास दिलेली महत्त्वाची देणगी म्हणून पंचायतराज प्रणालीचा विचार करता येईल. 'भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ, सक्षम व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. त्या दृष्टीकोनातून स्थानिक संस्थांना स्वायतत्ता व स्वातंत्र्य देण्यात आले.'[1] लोकशाही शासन व्यवस्था अधिक सक्षम बनविण्याच्या कार्यात पंचायतराज प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरली आहे. यशवंतराव चव्हाण यांची पंचायत राज व्यवस्था राबविण्यामागची भूमिका उदात्त होती. पुढीलप्रमाणे काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवता येतील.

१. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे तसेच देशाचे दूरदर्शी नेते होते.
२. पंचयत राज प्रणालीचा अवलंब करून त्यांनी भारतीय सर्व सामान्य जनतेस राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले.
३. भारत हा जगातील अत्यंत महत्त्वाचा लोकशाहीप्रधान देश असून पंचायत राज व्यवस्था लोकशाहीस बळकट करण्याचे कार्य करते.
४. पंचायत राज मुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक नेतृत्वाचा विकास झाला.
५. स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक नेतृत्वाची निवड झाल्यामुळे राज्य वा केंद्र नेतृत्वाकडे जाण्याची गरज उरली नाही.
६. स्थानिक प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व निर्माण होणे हे पंचायतराज प्रणालीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.
७. पंचायतराजमधील आरक्षण धोरणामुळे स्त्रियांना आपले नेतृत्व गुण विकसित करण्याची संधी मिळाली.
८. समाजातील प्रत्येक गटातील व्यक्ती नेतृत्वाच्या केंद्रस्थानी आली. परिणामी प्रत्येक समाज घटकाचा विकास होणे सुलभ झाले.

पंचायतराजमधील महत्त्वाचा घटक असलेल्या ग्रामपंचायतीच्या स्थापनेबाबत भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. शिवाय स्थानिक शासन हा विषय राज्यसूचीमध्ये टाकण्यात आलेला असल्यामुळे स्थानिक शासनाबद्दल कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाच्या अधिकार कक्षेत येतो. एकंदर देशातील



प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यातील गरजेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उभारणीसाठी, बळकटीकरणासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

एकूण यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या दूरगामी विचारातून पंचायतराज ही योजना राबवली. स्थानिक नेतृत्वाचा विकास, स्थानिक प्रश्नांची योग्य उकल, वेळेची बचत अशा कितीतरी बाबी पंचायतराजमधून पुढे आल्या आहेत, हे नाकारता येत नाही. आजही या योजनेच्या अनेक सकारात्मक बाजू आपल्या समोर आहेत. देशाच्या मागील ७५ वर्षातील महत्त्वाच्या घडामोडींचा विचार करता पंचायत राज प्रणाली ही समाज, राज्य, देशाच्या उभारणीत अत्यंत महत्त्वाची ठरली आहे, हे नाकारता येत नाही.

## संदर्भ सूची -

१. प्रा. अशोक नाईकवाडे (संपा) – आधुनिक भारताचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण – प्रकाशक, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद – ७ मार्च २००९ – पृ. १३५.
२. लोकराज्य – वर्ष ६३ वे, अंक १२ – लेख प्रगतीमागील प्रतिभा – मार्च २०१२ – पृ. ८२.
३. प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे – यशवंतराव चव्हाण : एक चिंतन – मुक्तरंग प्रकाशन, लातूर – प्र. आ. ९ फेब्रुवारी २०११ – पृ. ६२.
४. तत्रैव – पृ. ६२.
५. https://mr.wikipedia.org.wiki